**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक ०७.०८.२०२६ शुक्रवार**

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे जनतेला आवाहन : डायल ११२–एक कॉल, अनेक सेवा, तत्पर मदत**

नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत नागपूर पोलीस दल हे सर्वसामान्य जनतेच्या सेवेत २४ तास तत्पर असते. सर्वसामान्य जनतेस गुन्ह्यासंबंधाने अथवा कोणत्याही अडीअडचणीचे वेळीस पोलीसांची मदत मिळावी याकरीता शासनस्तर तसेच पोलीस खातेस्तरावरून पोलीस नियंत्रण कक्ष येथे मदतीकरीता डायल ११२ वर संपर्काची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सर्वसामान्य जनतेस आवाहन करण्यात येते की, त्यांनी महिलासुरक्षा, घरगुती हिंसाचार, आगीच्या घटना, अपघात, गुन्ह्यांची/गुन्हेगारांची/अनैतिक कृत्य/असामाजिक कृत्य तसेच वैद्यकीय आणीबाणीबाबत माहिती देण्याकरीता/कळविण्याकरीता पोलीस नियंत्रण कक्ष येथे कार्यरत डायल ११२ वर संपर्क साधावा. कोणत्याही संकटसमयी आपणास डायल ११२ ची मदत २४ तास उपलब्ध असल्याने नागरीकांनी डायल ११२ चा उपयोग न संकोचता करावा. डायल ११२ वर कॉल करणारे कॉलर यांची माहिती गुप्त ठेवण्यात येते.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०६.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण १,६४,९२०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०१ इसमांवर कारवाई करुन १४,३२५/– रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०६५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१७,३५०/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०६.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०७.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण १२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथक पोलीसांची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०६.०८.२०२६ चे २१.३० वा. ते ०७.०८.२०२६ चे ००.४५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत वार्ड नं. १५ समोर, स्वस्त धान्य दुकानाजवळील रोडवर एक ईसम दुचाकीजवळ संशयीतरित्या दिसल्याने त्याचे जवळ जात असता तो पळण्याचे प्रयत्नात असतांना त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सलीम खान साजीद खान वय ४० वर्ष रा. घर नं. ३६६, वार्ड नं. २०, बेसा

पावर हाऊस मागे, न्यु म्हाळगीनगर, नागपूर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे उजवे खिशात एका झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर मिळून आली. वजन केले असता, ३२.२०० ग्रॅम इतके भरले. आरोपीचे ताब्यात एमडी पावडर, ०२ मोबाईल फोन, एक पिवळ्या धातूची अंगठी वजनी ६ ग्रॅम व बर्गमॅन मोपेड असा मुद्देमाल मिळून आला. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने त्याचे राहते घरी एमडी पावडर लपवून ठेवल्याचे सांगितले. त्याचे राहते घरी गेले असता, त्याने बाथरूममध्ये झिपलॉक पन्नीमध्ये लपवून ठेवलेले एमडी पावडर काढून दिले. वजन केले असता, ६७.८१० ग्रॅम इतके भरले. आरोपीस एमडी पावडर कोठून आणले याबाबत विचारणा केली असता, त्याने नमुद एमडी पावडर त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे संजय कालीया रा. जबलपूर रोड पूलाजवळ, हुडकेश्वर, नागपूर याचेकडून विकत घेतल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातून एकुण १०५.०२ ग्रॅम एमडी पावडर किमती १०,५०,२००/— रू. ची, ०२ मोबाईल फोन, एक पिवळ्या धातूची अंगठी वजनी ६ ग्रॅम व बर्गमॅन मोपेड असा एकुण १३,३०,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. त्यांचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपींस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. दर्शन पाटील, पोहवा. किशोर ठाकरे, लक्ष्मण चौरे, प्रकाश माथनकर, पोअं. अश्वीन मांगे, कुणाल बोडखे, समीर शेख, नितीन वासने, कमलेश क्षिरसागर, मपोहवा आरती चव्हाण, व मपोअं. पुनम शेंडे यांनी केली.



**३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०७.०८.२०२६ चे ०२.३० वा. ते ०४.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस हे पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, श्याम लॉन चौकातून एक काळ्या रंगाची स्कार्पिओ भरधाव वेगाने पलोटी चौकाकडे जातांना दिसल्याने संशयावरून वाहनाचा पाठलाग केला असता नमुद वाहन गोरेवाडा रिंगरोड, स्वागतनगर येथील स्टार मोटर्स मल्टी कार वर्कशॉप समोर थांबले. स्कॉर्पिओतून उतरलेला ईसम याने तेथे उभ्या दुसऱ्या एका ईसमासोबत काहितरी देवाण—घेवाण करतांना दिसल्याने त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांवे, १) दानीश खान अबरार खान वय ४२

वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, युन्हिवर्सल पब्लीक स्कुलजवळ, जाफरनगर, नागपूर २) मुकर्रम मुनावर अली काझी वय ३२ वर्षे रा. प्लॉट नं. २३ शुक्ला आटा चक्कीजवळ, स्वागत नगर नागपूर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र १ याचे जवळ झिपलॉक पन्नीमध्ये ११ ग्रॅम एमडी पावडर व मोबाईल फोन मिळून आला. आरोपी क्र. २ याचे पॅन्टचे खिश्यात झिपलॉक पन्नीत एकुण १० ग्राम एम.डी. पावडर व मोबाईल फोन मिळून आला. दोन्ही आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, २१ ग्रॅम, ०२ मोबाईल फोन, व काळ्या रंगाची स्कार्पिओ गाडी असा एकुण १७,३०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना एमडी पावडरबाबत विचारणा केली असता त्यानी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी सय्यद ईरफान अली वय अंदाजे ३४ वर्षे रा. मोमीनपूरा, नागपूर याचेकडून आणल्याचे सांगितले. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता देवाण घेवाण करतांना व बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिछेवार, पोहवा शैलेष दाबोले, पवन गजभिये, अरविंद गेडेकर, नितीन साळूंके, मपोहवा अनुप यादव, पोअं. धनपत मंजरेटे, शेषराव रेवतकर यांनी केली.



**<u>४) कळमना पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०६.०८.२०२६ चे १७.३० वा. ते २०.१० वा. चे दरम्यान, कळमना पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता, हस्तीनापूरकडून भिलगाव सिटीकडे जाणाऱ्या रोडवरील नाल्याचे बाजूला एक पांढऱ्या रंगाची फोर्ड कंपनीची फिगो चार चाकी क्र. एमएच ४३ एएफ ९६६४ मध्ये दोन ईसम संशयीतरित्या बसलेले मिळुन आले. त्यांना नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे १) अतिक रफीक खान वय ३३ वर्ष रा. नाका नं. ०२, लेंन्डे नगर प्लॉट नं. १०४, कपिलनगर २) अमित विनायक मानकर वय ३७ वर्षे, रा. प्लॉट नं. १९१, संन्याल नगर टेकानाका, नागपूर असे सांगीतले. त्यांचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करून पंचासमक्ष त्यांची व कारची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यातील कारचे डिक्कीमध्ये प्लॅस्टीक बोरीत हिरव्या रंगाचा अंमली पदार्थ गांजा एकुण वजनी २ किलो ४३ ग्रॅम मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, ०१ मोबाईल फोन, व चारचाकी असा एकुण ४,६०,०००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),**11**(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार

होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमना येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहित ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि करीम पठाण, पोउपनि. गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, पोअं. नितीन मिश्रा, ललित शेंडे, यांनी केली.

**५) गुन्हेशाखा, युनिट क्र. ५ पथकांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०८.२०२६ चे ०१.१२ वा. ते ०३.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, युनिट क्र. ०५ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, पांढुर्णा गाव, भगवान धोटे याचे शेतातील झोपडीमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) निलेश राजेंद्र चव्हाण, वय २५ वर्षे, रा. दिघोरी सर्वश्रीनगर, नागपूर २) अंकुश सुरेश खडकी वय ४३ वर्षे, रा. बाळाभाऊ पेठ, पाचपावली, नागपूर ३) प्रभाकर लक्ष्मणराव भगत, वय ४२ वर्षे,रा. प्लॉट नं. ६१, शारदानगर, बहादुरा, नागपूर ४) अमित किशांर खोब्रागडे, वय ३७ वर्षे, रा. जुनी कामठी, नागपूर ५) शुभम बिसनलाल मस्करे, वय २७ वर्षे, रा. धोटे ले—आऊट, पांढूर्णा, नागपूर ६) सुनिल दादुजी बिसेन, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट नं. ४८, रेणूका माता नगर, नागपूर ७) विजय केशवराव पाटील, वय ५३ वर्षे, रा. ईतवारी, तेलीपूरा, पेवठा, नागपूर ८) भगवान खत्तुजी धोटे, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३२, पांढूर्णा, नागपूर ९) स्वप्नील राजेंद्र मेश्राम, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, जुनी वस्ती, दिघोरी, नागपूर हे समक्ष ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३२,०४५/—रू., वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ०९ मोबाईल फोन, ०५ दुचाकी वाहने, ०२ चार चाकी वाहने, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण २२,३७,०४५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम १२ अ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास वाठोडा पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**६) गुन्हेशाखा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथक पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०८.२०२६ चे २१.०० वा. ते २२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, रॉयल ग्रीन ले—आऊट, लाल गेटमधील परिसर, कॅनल जवळील मोकळ्या जागेत बांबूचे

टेन्टमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) शुभम मुकेश चौधरी, वय २२ वर्षे, २) सायांश सुधीर शरण, वय १९ वर्षे, दोन्ही रा. न्यु येरखेडा, कामठी, नागपूर ३) अखिल धर्मराज सोरमोर, वय १९ वर्षे, रा. खैरी कामठी, नागपूर ४) सफर बेग मुस्ताक अहमद, वय ३८ वर्षे, रा. ईस्माईलपूरा, कामठी, नागपूर ५) मोहम्मद कलीम मिराज अहमद, वय २९ वर्षे, रा. भोई लाईन, कामठी, नागपूर ६) क्रिश विनोद करोशीया, वय २१ वर्षे, रा. गवळीपूरा, कामठी, नागपूर ७) मोहम्मद हसन अब्दुल मजीद, वय ५६ वर्षे, रा. नई वस्ती हबीब नगर, टेका, नागपूर हे पाहिजे आरोपी नामे शोएब अंसारी रा. लकडगंज, नवीन कामठी, याचे संगणमताने समक्ष ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ९,६००/–रू., वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ०५ मोबाईल फोन, ०३ मोटारसायकल, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १२,६२,५००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास यशोधरानगर पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती संजीवनी थोरात, सफौ. दिपक बिंदाणे, पोहवा. राम निरगुडवार, सचिन श्रीरामे, सुनिल वाकडे, पोअं. ऋषिकेश डुंबरे व मपोअं. अश्वीनी खोडपेवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :– निष्काळजीपणे मृत्युस कारणीभुत आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०८.२०२६ चे १०.३० वा. ते ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. २६, वांजरी नाका नं. ०२ रोड, रहमतनगर येथील अंसारी फेब्रीकेशन कारखाना येथे फिर्यादीचे मोठे भाऊ नामे सईद अहमद वल्द वकील अहमद अंसारी, वय ५० वर्षे, रा. आझाद नगर, नई वस्ती टेका, नागपुर हे फेब्रीकेशन वेल्डींगचे काम करीत असतांना गॅस सिलेंडर फुटल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. कारखाना मालक अब्दुल कयुम अंसारी वय ५५ वर्षे रा. फारूख नगर टेकानाका, यशोधरानगर याला कारखान्यातील गॅस वेल्डींग करण्याची टार्प खराब आहे तसेच त्यातून गॅस लिक होण्याचा आवाज येत आहे. हे माहित असूनसुध्दा तसेच त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे अशी खात्री असतांना कारखाना मालक आरोपीच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटना होवून फिर्यादीचे भाऊ मरण पावले, त्यांचे मरणास आरोपी कारणीभुत आहे. अशा फिर्यादी तुफैल अहमद वकील अहमद अंसारी, वय ४० वर्ष, रा. आझाद नगर, नई वस्ती टेका, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. सुरेश बुंदे ८९९९६९४०१३ यांनी कारखाना मालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**